**परिपत्रक 310 दिनांक 2/6/2004**

**विषय :- कार्यालयीन अनुपस्थितीबाबत.**

असे निदर्शनास आले आहे की, बरेचसे कर्मचारी रजा विना मंजूरीशिवाय आणि पूर्वपरवानगी न घेता कार्यालयामध्ये अनुपस्थितीत राहतात. त्यामुळे कार्यालयीन कामकाजामध्ये अनेक प्रकारचे अडथळे तसेच अडचणी निर्माण होऊन अधिकारी वर्गास कामकाजामध्ये कर्मचारी वर्गावर अनावश्यक अवलंबून रहावे लागते. सदरहू बाब ही कार्यालयीन शिस्तीस धरुन नसल्याचे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

तरी आता या परिपत्रकान्वये सर्व कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात येत आहे की, पूर्व परवानगी व पूर्व सुचनेशिवाय आणि विना रजा मंजूरी शिवाय रजेवर गेल्याचे आढळून आल्यास यापुढे सदरहू कर्मचाऱ्यांच्या रजा विनावेतन करण्यांत येईल. याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (रजा ) नियम 1981 याकडे संबंधितांचे लक्ष केंद्रीत करण्यात येत आहे.

सर्व अधीक्षकांनी आपआपल्या शाखेतील कर्मचारी सदर सुचनंाचे अनुपालन करीत नसतील त्यांची नांवे त्याच्या शाखा अधिकाऱ्यामार्फत आस्थापना शाखेत कळवावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीसाठी

1. सर्व शाखांचे अधिकारी/अधीक्षक
2. सर्व विभागीय कार्यालय प्रत